**म. सं. कौ. हिं. का. अर्ज २८/२०२२**

**नि.क्र. १८ लगत**

**शपथेवर साक्षीदाराची साक्ष अर्जदारातर्फे साक्षीदार क्र. १**

माझे नांव – मनिषा रघुनाथ गाढे,
वय - ३३ वर्षे, व्यवसाय – शेती,
राहणार – हातगांव ता. शेवगांव जि. अहमदनगर.

साक्षीदाराचा शपथेवर उलटतपास सामनेवालातर्फे वकील श्री.एस.बी.सानप यांचे मार्फतः:-

१०. हे म्हणणे खरे नाही की, मी माहेरी आल्यानंतर सामनेवाला येवून माझी समजुत घालायचे व त्यानंतर मी सासरी जात असायचे.हे म्हणणे खरे नाही की, मी रात्री अपरात्री घराबाहेर निघुन जात असे. हे म्हणणे खरे नाही की, माझी रंभा सोबत एकत्रीत राहण्याची इच्छा नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी सामनेवाला नं. १ यांना म्हणाले की, जोपर्यंत ते सामनेवाला नं. २ हिला सोडुन देत नाही तोपर्यंत मुल बाळ होवू देणार नाही, मी सामनेवाला यांच्यासोबत राहणार नाही.

११. हे म्हणणे खरे नाही की, सन २०२२ मधील संक्रात सणानंतर आठ दिवसांनी मी माझ्या माहेरी निघुन आले. हे म्हणणे खरे नाही की, मी सन २०२२ मध्ये सामनेवाला यांना कुठलीही कल्पना न देता दाग दागिणे घेवून मी घरातुन निघुन आले. हे म्हणणे खरे नाही की, त् त्यानंतर सामनेवाला नं. १ हे माझी शोधाशोध केल्यानंतर मी माझ्या माहेरी त्यांना आढळुन आले. मी दोन तीन वर्षांपासुन माहेरी राहते.

१२. हे म्हणणे खरे नाही की, मी माहेरी आल्यानंतर सामनेवाला यांनी हातगाव येथे नातेवाईकांमार्फत बैठक ठरवलेली होती. हे म्हणणे खरे नाही की, सदर बैठकीमध्ये मी सामनेवाला यांना त्यांची संपुर्ण मिळकत माझ्या नावावर करण्याची तसेच सामनेवाला नं. २ रंभा यांच्या सोबत न राहण्याच्या जाचक अटी लादल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, सदर बैठकीमध्ये मी नांदायला येण्यासाठी स्पष्ट नकार दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी माहेरी राहत असताना नांदायला जाण्यासाठी स्वतःहुन कोणतेही प्रयत्न केलेले नाहीत. मी

नांदायला जाण्यासाठी प्रयत्न केला हे दाखवण्यासाठी माझ्याकडे कोणताही कागदोपत्री पुरावा नाही. मी आजरोजी नांदायला जाण्यास तयार नाही. हे म्हणणे खरे आहे की, आज माझी सामनेवाल्याकडुन पैसे मिळावेत आणि नाते तोडावे एवढीच इच्छा आहे.

१३. हे म्हणणे खरे नाही की, सामनेवाला नं. १ व २ यांनी मला लग्नानंतर दोन ती महिन्यानंतर त्रास द्यायला सुरुवात केली, माझ्यावर संशय घेत असत, माझ्याशी बोलत नसे, माझ्याकडुन काम करुन घेत असत, त्यानंतर मला धान्य विकत देत असत, मारहाण करत असत, व भावाकडुन एक लाख रुपये घेवून ये अशी मागणी करत असत, हा मजकुर मी खोटा लिहीलेला आहे.

१४. सामनेवाल्यांनी माझ्या कानाला असे मी न्यायालयात सांगितले आहे त्यासाठी मी दवाखान्यात गेले होते. मी दवाखान्यात उपचार घेतले हे दाखवणारे कागदपत्रे मी न्यायालयात हजर करु शकत नाही. सामनेवाला नं. १ यांनी आमच्याकडे एक लाख रुपयाची मागणी केली त्याची तारीख, वार व वर्ष मला सांगता येणार नाही.

१५. हे म्हणणे खरे आहे की, सामनेवाला नं. १ याच्यासोबत लग्न करण्याचा उद्येश की, सामनेवाला नं. २ हीला मुलबाळ होत नाही. हे म्हणणे खरे आहे की, सामनेवाला नं. १ व २ या दोघानीही मुल बाळ होण्यासाठी सामनेवाला नं. १ ह्याचे लग्न माझ्यासोबत लावले. हे म्हणणे खरे नाही की, सामनवाला नं. २ यांनी संमतीने माझे लग्न लावले होते. साक्षीदार परत सांगते की, मुलबाळ होण्यासाठी माझे लग्न केले होते.

१६. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या लग्नानंतर असणा–या विधींसाठी सामनेवाल नं. २ ही हजर होती. हे म्हणणे खरे नाही की, सामनेवाला नं. २ यांनी कधीही माझ्या व माझ्या नव–यामध्ये हस्तक्षेप केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला नांदण्याची इच्छा नसल्यामुळे सामनेवाला विरुध्द खोटी कथने करुन खोटी केस केलेली आहे.

१७. हे म्हणणे खरे नाही की, सामनेवाला नं. १ ह्याच्याकडे तीन ते चार एकर बागायती शेती आहे हे दाखवणारा कोणताही कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही. मी कागदोपत्री पुरावा दाखल करण्यास तयार आहे. सामनेवाला तयाच्या शेतामध्ये ऊस, कापुस, भुईमुंग ही पीके घेतात हे दाखवणारा माझ्याकडे कागदोपत्री पुरावा आहे. सदरचा कागदोपत्री पुरावा न्यायालयात दाखल करण्यास मी तयार आहे. सामनेवाला यांना सर्व खर्च वजा जाता दर साल पाच लाख रुपये मिळतात हे दाखवणारा कागदोपत्री पुरावा माझ्याकडे आहे. सदरचा कागदोपत्री पुरावा दाखल करण्यास मी तयार आहे. हे म्हणणे खरे नाही की,

सामनेवाला यांना बागायती क्षेत्र असुन त्यातुन त्यांना दर साल पाच लाख रुपये उत्पन्न मिळते हे मी खोटे सांगत आहे.

प्रश्न – सदरचा अर्ज तुम्ही सामनेवाला कडुन पैसे मिळण्यासाठी, घटस्फोट मिळण्यासाठी, की नांदयला जाण्यासाठी दाखल केला आहे?

उत्तर – पैसे मिळण्यासाठी.

१८. हे म्हणणे खरे नाही की, सामनेवाला यांनी कोणताही त्रास दिला नसतांना देखील फक्त सामनेवाला कडुन पैसे उकळण्यासाठी मी खोटया कथनाचा अर्ज दाखल करुन आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

श्रवणोत्तर स्वीकृति

sd/-

दिनांक-०८.०१.२०२५

(मोनाली अ.बेंद्रे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधीकारी
कोर्ट नं. ३ शेवगाव.